# राज्य सहकारी निवडणुक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे
## जुनी मध्यवर्ती इमारत, तळ मजला, पुणे-४११००१

**फोन नं.(०२०) २६०५०६४१**
**ई-मेल आयडी :-** comscea.pune@maharashtra.gov.in secscea.pune@maharashtra.gov.in

५४९
जा.क्र.रासनिप्रा/जिल्हासनिअ आदेश/सन २०१४ दि. १०/१०/२०१४

**वाचावे :** १. महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० व नियम १९६१
२. शासन अधिसूचना दिनांक ३०/०३/२०१३
३. महाराष्ट्र सहकारी संस्था (समिती निवडणूक) नियम २०१४ दिनांक ११ सप्टेंबर २०१४

ज्याअर्थी, महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० च्या दि.१३ ऑगस्ट २०१३ च्या (सुधारणा) अधिनियमातील कलम ७३ कब नुसार राज्यातील सर्व सहकारी संस्थांच्या निवडणूका राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणामार्फत घेण्याची तरतुद आहे, आणि,

ज्याअर्थी, शासन अधिसूचना दिनांक ३०/०३/२०१३ अन्वये राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणाचे गठण करण्यात आले आहे, आणि,

ज्याअर्थी, महाराष्ट्र सहकारी संस्था निवडणूक (समिती निवडणूक) नियम २०१४ दिनांक ११/०९/२०१४ अन्वये अधिसुचीत करण्यात आलेले आहेत, आणि सदर नियमातील तरतुदीनुसार राज्यातील सर्व सहकारी संस्थांच्या निवडणूका घेण्यासाठी नियम क्र.२(८) नुसार जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी यांची व्याख्या करण्यात आलेली आहे . तसेच राज्यातील त्या त्या जिल्हयातील जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था यांना त्यांचे वैधानिक अधिकारक्षेत्रात जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी म्हणून मान्यता देणे क्रमप्राप्त आहे,

ज्याअर्थी, सहनिबंधक, सहकारी संस्था, सिडको यांना त्यांच्या वैधानिक अधिकार क्षेत्रातील सहकारी गृहनिर्माण संस्था आणि सहकारी व्यापारी संकुल संस्था यांचे वैधानिक अधिकार त्यांचे कडे असल्याने अशा सहकारी संस्थांच्या निवडणुकीसाठी त्यांना जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी म्हणून मान्यता देणे क्रमप्राप्त आहे,

ज्याअर्थी, प्रादेशिक उपसंचालक, वस्त्रोद्योग यांना त्यांच्या वैधानिक अधिकार क्षेत्रातील सहकारी सूत गिरण्या, हातमाग सहकारी संस्था, यंत्रमाग सहकारी संस्था व वस्त्रोद्योग सहकारी संस्था यांचे वैधानिक अधिकार त्यांचे कडे असल्याने अशा सहकारी संस्थांच्या निवडणुकीसाठी त्यांना जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी म्हणून मान्यता देणे क्रमप्राप्त आहे,

ज्या अर्थी, विभागीय उपनिबंधक, सहकारी संस्था दुग्ध यांना त्यांचे वैधानिक अधिकार क्षेत्रातील दुग्ध सहकारी संस्था, मत्स्य सहकारी संस्था, पशुसंवर्धन सहकारी संस्था, वराहपालन सहकारी संस्था यांचे वैधानिक अधिकार त्यांचे कडे असल्याने अशा सहकारी संस्थांच्या निवडणुकीसाठी त्यांना जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी म्हणून मान्यता देणे क्रमप्राप्त आहे,

ज्याअर्थी, प्रादेशिक सहसंचालक, सहकारी संस्था (साखर) यांना त्यांचे वैधानिक अधिकार क्षेत्रातील सहकारी साखर कारखान्यांचे वैधानिक अधिकार त्यांचे कडे असल्याने अशा सहकारी संस्थांच्या निवडणुकीसाठी त्यांना जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी म्हणून मान्यता देणे क्रमप्राप्त आहे,

ज्याअर्थी, उपनिबंधक, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, मुंबई (MMRDA) यांना त्यांच्या वैधानिक अधिकार क्षेत्रातील सहकारी गृहनिर्माण संस्था व सहकारी व्यापारी संकुल संस्था अशा सहकारी संस्थांचे वैधानिक अधिकार त्यांचे कडे असल्याने अशा सहकारी संस्थांच्या निवडणुकीसाठी त्यांना जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी म्हणून मान्यता देणे क्रमप्राप्त आहे,

ज्याअर्थी, उपनिबंधक, सहकारी संस्था, म्हाडा यांना त्यांचे वैधानिक अधिका रक्षेत्रातील सहकारी गृहनिर्माण संस्था, सहकारी व्यापारी संकुल संस्था अशा सहकारी संस्थांचे वैधानिक अधिकार त्यांचे कडे असल्याने अशा सहकारी संस्थांच्या निवडणुकीसाठी त्यांना जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी म्हणून मान्यता देणे क्रमप्राप्त आहे,

ज्या अर्थी, सहनिबंधक, सहकारी संस्था, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण (पूर्व व पश्चिम) मुंबई यांना त्यांचे वैधानिक अधिकार क्षेत्रातील सहकारी गृहनिर्माण सहकारी संस्थांचे वैधानिक अधिकार त्यांचेकडे असल्याने अशा सहकारी संस्थांच्या निवडणुकीसाठी त्यांना जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी म्हणून मान्यता देणे क्रमप्राप्त आहे,

राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य

त्याअर्थी, उक्त नमूद सहकारी संस्थांच्या निवडणुका घेणेसाठी राज्य सहकारी निवडणुक प्राधिकरण, महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७३ कब व उक्त निवडणूक नियमातील नियम ३ अन्वये प्राप्त अधिकारास अनुसरुन खालील प्रमाणे स्तंभ २ मधील अधिकारी यांना, स्तंभ ३ मधील त्यांचे वैधानिक अधिकारक्षेत्रासह, तसेच विभाग/राज्य/जिल्हास्तरीय कार्यक्षेत्र असलेल्या परंतू ज्या सहकारी संस्थांचे मुख्यालय त्यांच्या जिल्हयात आहे , अशा सर्व सहकारी संस्थांच्या निवडणूकांसाठी जिल्हा सहकारी निवडणुक अधिकारी म्हणून मान्यता देण्यात येत आहे.

| अ.क्र. | अधिकारी | कार्यक्षेत्र |
|---|---|---|
| १ | २ | ३ |
| १ | जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, मुंबई-१ | मुंबई मुख्य शहर .<br>(ए, बी, सी, डी, इ, एफ-एस, एफ-एन, जी-एस, जी-एन वॉर्डस्) |

| अ.क्र. | अधिकारी | कार्यक्षेत्र |
|---|---|---|
| २ | जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था,मुंबई-२ | मुंबई पूर्व उपनगरे.<br>(एल, एम, एन, एस व टी वॉर्डस्) |
| ३ | जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था,मुंबई-३ | बृहन्मुंबई महानगर पालिकेतील मुंबई पश्चिम उपनगरे विभाग एच-पूर्व, एच-पश्चिम, के-पूर्व, के-पश्चिम विभाग.<br>वरील कार्यक्षेत्रापुरते कार्यक्षेत्र असलेल्या सहकारी संस्था तसेच बृहन्मुंबई महानगर पालिकेपुरते कार्यक्षेत्र असलेल्या ज्या संस्थांचे नोंदणीकृत कार्यालय त्यांचे कार्यक्षेत्रामध्ये आहे, त्या संस्थांसह. |
| ४ | जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था,.मुंबई-४ | बृहन्मुंबई महानगर पालिकेतील मुंबई पी-दक्षिण, पी-उत्तर, आर-दक्षिण, आर-उत्तर विभाग.<br>वरील कार्यक्षेत्रापुरते कार्यक्षेत्र असलेल्या सहकारी संस्था तसेच बृहन्मुंबई महानगर पालिकेपुरते कार्यक्षेत्र असलेल्या ज्या संस्थांचे नोंदणीकृत कार्यालय त्यांचे कार्यक्षेत्रामध्ये आहे, त्या संस्थांसह. |
| ५ | जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, ठाणे | संपूर्ण ठाणे जिल्हा |
| ६ | जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, रायगड | संपूर्ण रायगड जिल्हा |
| ७ | जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, रत्नागिरी | संपूर्ण रत्नागिरी जिल्हा |
| ८ | जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, सिंधुदूर्ग | संपूर्ण सिंधुदूर्ग जिल्हा |
| ९ | जिल्हा उपनिबंधक,सहकारी संस्था, पुणे ग्रामीण | पुणे जिल्हयातील इंदापूर, बारामती, दौंड, शिरूर, जुन्नर, आंबेगाव, खेड, मावळ, मुळशी, पुरंदर आणि वेल्हा तालुके.<br>वरील कार्यक्षेत्रा पुरते कार्यक्षेत्र असलेल्या सहकारी संस्था तसेच पुणे जिल्हा कार्यक्षेत्र असलेल्या सहकारी संस्था ज्यांचे नोंदणीकृत कार्यालय त्यांचे कार्यक्षेत्रा मध्ये आहे अशा संस्था मात्र जिल्हयातील सर्व प्राथमिक कृषी पतपुरवठा सहकारी संस्था, पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक आणि जिल्हा कृषी व ग्रामिण बहुउद्देशीय विकास बँक या संस्थांसह |
| १० | जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे शहर | पुणे महानगरपालिका, पिंपरी-चिंचवड महानगर पालिका, खडकी कॉन्टोनमेंट बोर्ड आणि हवेली तालुका.<br>वरील कार्यक्षेत्रा पुरते कार्यक्षेत्र असलेल्या सहकारी संस्था तसेच पुणे जिल्हा कार्यक्षेत्र असलेल्या सहकारी संस्था ज्यांचे नोंदणीकृत कार्यालय त्यांचे कार्यक्षेत्रा मध्ये आहे अशा संस्था मात्र जिल्हयातील सर्व प्राथमिक कृषी पतपुरवठा सहकारी संस्था, पुणे जिल्हा मध्यवर्ती बँक आणि जिल्हा कृषी व ग्रामिण बहुउद्देशीय विकास बँक या |

| अ.क्र. | अधिकारी | कार्यक्षेत्र |
|---|---|---|
| | | संस्था व्यतिरिक्त. |
| ११ | जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, सोलापूर | संपूर्ण सोलापूर जिल्हा |
| १२ | जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, कोल्हापूर | संपूर्ण कोल्हापूर जिल्हा |
| १३ | जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, सांगली | संपूर्ण सांगली जिल्हा |
| १४ | जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, सातारा | संपूर्ण सातारा जिल्हा |
| १५ | जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, नाशिक | संपूर्ण नाशिक जिल्हा |
| १६ | जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, धुळे | संपूर्ण धुळे जिल्हा |
| १७ | जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, नंदुरबार | संपूर्ण नंदुरबार जिल्हा |
| १८ | जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, जळगांव | संपूर्ण जळगांव जिल्हा |
| १९ | जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, अहमदनगर | संपूर्ण अहमदनगर जिल्हा |
| २० | जिल्हा उपनिबंधक, सह. संस्था, औरंगाबाद | संपूर्ण औरंगाबाद जिल्हा |
| २१ | जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, जालना | संपूर्ण जालना जिल्हा |
| २२ | जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, परभणी | संपूर्ण परभणी जिल्हा |
| २३ | जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, हिंगोली | संपूर्ण हिंगोली जिल्हा |
| २४ | जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, लातूर | संपूर्ण लातूर जिल्हा |
| २५ | जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, बीड | संपूर्ण बीड जिल्हा |
| २६ | जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, नांदेड | संपूर्ण नांदेड जिल्हा |
| २७ | जिल्हाउपनिबंधक, सह. संस्था, उस्मानाबाद | संपूर्ण उस्मानाबाद जिल्हा |
| २८ | जिल्हाउपनिबंधक, सहकारी संस्था, अमरावती | संपूर्ण अमरावती जिल्हा |
| २९ | जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, अकोला | संपूर्ण अकोला जिल्हा |
| ३० | जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, बुलढाणा | संपूर्ण बुलढाणा जिल्हा |
| ३१ | जिल्हाउपनिबंधक, सहकारी संस्था, यवतमाळ | संपूर्ण यवतमाळ जिल्हा |
| ३२ | जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, वाशिम | संपूर्ण वाशिम जिल्हा |
| ३३ | जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, नागपूर | संपूर्ण नागपूर जिल्हा |
| ३४ | जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, वर्धा | संपूर्ण वर्धा जिल्हा |
| ३५ | जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, चंद्रपूर | संपूर्ण चंद्रपूर जिल्हा |
| ३६ | जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, भंडारा | संपूर्ण भंडारा जिल्हा |
| ३७ | जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, गोंदिया | संपूर्ण गोंदिया जिल्हा |
| ३८ | जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, गडचिरोली | संपूर्ण गडचिरोल जिल्हा |
| | **सहनिबंधक, सिडको यांचे अधिकार क्षेत्रातील सहकारी संस्थांचे जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी** | |
| ३९ | सहनिबंधक, सहकारी संस्था, सिडको, नवी मुंबई | सिडको, नवी मुंबई यांच्या अधिकार क्षेत्रातील सर्व सहकारी गृहनिर्माण संस्था व सहकारी व्यापारी संकुल संस्था |

| अ.क्र. | अधिकारी | कार्यक्षेत्र |
| --- | --- | --- |
| **प्रादेशिक उपसंचालक (वस्त्रोद्योग) यांचे अधिकार क्षेत्रातील सहकारी सूत गिरण्या, हातमाग सहकारी संस्था, यंत्रमाग सहकारी संस्था व वस्त्रोद्योग सहकारी संस्थांचे जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी** | | |
| ४० | प्रादेशिक उपसंचालक, वस्त्रोद्योग, मुंबई | संपूर्ण मुंबई, रत्नागिरी, रायगड, सिंधुदूर्ग, ठाणे, नाशिक, धुळे, नंदुरबार, जळगांव व अहमदनगर जिल्हयातील वरील प्रकारच्या सहकारी संस्थांपुरते मर्यादित |
| ४१ | प्रादेशिक उपसंचालक, वस्त्रोद्योग, औरंगाबाद | संपूर्ण औरंगाबाद, जालना, परभणी, हिंगोली, नांदेड, बीड, उस्मानाबाद, लातूर जिल्हयातील वरील प्रकारच्या सहकारी संस्थांपुरते मर्यादित |
| ४२ | प्रादेशिक उपसंचालक, वस्त्रोद्योग, सोलापूर | संपूर्ण सोलापूर, कोल्हापूर, सांगली, सातारा व पुणे जिल्हयातील वरील प्रकारच्या सहकारी संस्थांपुरते मर्यादित |
| ४३ | प्रादेशिक उपसंचालक, वस्त्रोद्योग, नागपूर | संपूर्ण नागपूर, भंडारा, गोंदिया,चंद्रपूर, वर्धा, गडचिरोली, अमरावती, अकोला, वाशिम, यवतमाळ व बुलढाणा जिल्हयातील वरील प्रकारच्या सहकारी संस्थांपुरते मर्यादित |
| **विभागीय उपनिबंधक, सहकारी संस्था (दुग्ध) यांचे अधिकार क्षेत्रातील मत्स्य सहकारी संस्था, पशुसंवर्धन सहकारी संस्था, वराहपालन सहकारी संस्थांचे जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी** | | |
| ४४ | विभागीय उपनिबंधक, सहकारी संस्था, (दुग्ध) कोकण | कोकण विभागातील सर्व जिल्हयांतील वरील प्रकारच्या सर्व सहकारी संस्थांपुरते मर्यादित |
| ४५ | विभागीय उपनिबंधक, सहकारी संस्था, (दुग्ध) नाशिक | नाशिक विभागातील सर्व जिल्हयांतील वरील प्रकारच्या सर्व सहकारी संस्थांपुरते मर्यादित |
| ४६ | विभागीय उपनिबंधक, सहकारी संस्था, (दुग्ध) पुणे | पुणे विभागातील सर्व जिल्हयांतील वरील प्रकारच्या सर्व सहकारी संस्थांपुरते मर्यादित |
| ४७ | विभागीय उपनिबंधक, सहकारी संस्था, (दुग्ध) औरंगाबाद | मराठवाडा विभागातील सर्व जिल्हयांतील वरील प्रकारच्या सर्व सहकारी संस्थांपुरते मर्यादित |
| ४८ | विभागीय उपनिबंधक, सहकारी संस्था, (दुग्ध) अमरावती | अमरावती विभागातील सर्व जिल्हयांतील वरील प्रकारच्या सर्व सहकारी संस्थांपुरते मर्यादित |
| ४९ | विभागीय उपनिबंधक, सहकारी संस्था, (दुग्ध) नागपूर | नागपूर विभागातील सर्व जिल्हयांतील वरील प्रकारच्या सर्व सहकारी संस्थांपुरते मर्यादित |
| **प्रादेशिक सहसंचालक, सहकारी संस्था, साखर यांचे अधिकार क्षेत्रातील सर्व सहकारी साखर कारखान्यांचे जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी** | | |
| ५० | प्रादेशिक सहसंचालक, सहकारी संस्था (साखर), कोल्हापूर | संपूर्ण कोल्हापूर, सांगली व रत्नागिरी जिल्हयातील सर्व साखर कारखाने |
| ५१ | प्रादेशिक सहसंचालक, सहकारी संस्था (साखर), पुणे | संपूर्ण पुणे, सातारा व सोलापूर जिल्हयातील सर्व साखर कारखाने |
| ५२ | प्रादेशिक सहसंचालक, सहकारी संस्था (साखर), अहमदनगर | संपूर्ण अहमदनगर व नाशिक जिल्हयातील सर्व साखर कारखाने |

| अ.क्र. | अधिकारी | कार्यक्षेत्र |
|---|---|---|
| ५३ | प्रादेशिक सहसंचालक, सहकारी संस्था (साखर), औरंगाबाद | संपूर्ण औरंगाबाद, जालना, बीड, धुळे, जळगांव, नंदुरबार जिल्हयातील सर्व साखर कारखाने |
| ५४ | प्रादेशिक सहसंचालक, सहकारी संस्था (साखर), नांदेड | संपूर्ण नांदेड, उस्मानाबाद, लातूर, परभणी, हिंगोली जिल्हयातील सर्व साखर कारखाने |
| ५५ | प्रादेशिक सहसंचालक, सहकारी संस्था (साखर), अमरावती | संपूर्ण अमरावती, बुलढाणा, वाशिम, अकोला, यवतमाळ जिल्हयातील सर्व साखर कारखाने |
| ५६ | प्रादेशिक सहसंचालक, सहकारी संस्था (साखर), नागपूर | संपूर्ण नागपूर, भंडारा, वर्धा, चंद्रपूर, गडचिरोली, गोंदिया जिल्हयातील सर्व साखर कारखाने |
| **उपनिबंधक, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, मुंबई (MMRDA) यांचे अधिकार क्षेत्रातील सहकारी संस्थांचे जिल्हा निवडणूक अधिकारी** | | |
| ५७ | उपनिबंधक, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, मुंबई (MMRDA) | मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, मुंबई (MMRDA) यांचे कार्यक्षेत्रातील सहकारी संस्था |
| **उपनिबंधक, म्हाडा, मुंबई यांचे अधिकार क्षेत्रातील सहकारी संस्थांचे जिल्हा निवडणूक अधिकारी** | | |
| ५८ | उपनिबंधक, सहकारी संस्था, म्हाडा, मुंबई | म्हाडा, मुंबई यांचे कार्यक्षेत्रातील सहकारी संस्थांपुरते मर्यादित. |
| **सहनिबंधक, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण (पूर्व व पश्चिम) मुंबई यांचे अधिकार क्षेत्रातील सहकारी संस्थांचे जिल्हा निवडणूक अधिकारी** | | |
| ५९ | सहनिबंधक, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण (पूर्व व पश्चिम) मुंबई | झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण (पूर्व व पश्चिम) मुंबई यांचे कार्यक्षेत्रातील सहकारी गृहनिर्माण सहकारी संस्थांपुरते मर्यादित |

**मा.आयुक्त, राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण यांचे निर्देशानुसार.**

**(डॉ.ए.बी.जोगदंड)**
**सचिव**
**राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण**
**महाराष्ट्र राज्य, पुणे**

**प्रति,**
संबंधीत जिल्हा सहकारी निवडणुक अधिकारी (सर्व)

प्रत माहितीस्तव :

१. विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था (सर्व)
२. तालुका/प्रभाग सहकारी निवडणूक अधिकारी (सर्व)

प्रत माहितीस्तव सस्नेह रवाना :

१. मा.सचिव, सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
२. मा.सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे
३. मा.आयुक्त (साखर), साखर संचालनालय, साखर संकुल, पुणे
४. मा.आयुक्त (दुग्धविकास), अब्दुल गफारखान मार्ग, वरळी सी-फेस , वरळी मुंबई
५. मा.संचालक, हातमाग, यंत्रमाग व वस्त्रोद्योग, नागपूर.